# एक आशावादी शास्त्रज्ञ

देशोदेशीच्या जीवघेण्या स्पर्धेत आपला देशही दोन पावलं पुढे असावा या प्र
विज्ञाननिष्ठ भारताचं स्वप्न एका बुद्धिमान तरुणाच्या मनात फुलत होतं. त्या त
पेटंटच्या आंतरराष्ट्रीय लढाईपर्यंत डॉ. माशेलकरांनी आपला

गिरगावातल्या एका मराठमोळ्या घरातल्या मुलीनं रायफल उचलली आणि
क्रीडास्पर्धा, एशियाड आणि सिडनी ऑलिंपिक्समध्ये नेमब

डॉ. माशेलकर यंदा म.टा. सन्मानाच्या 'महाराष्ट्र भूषण' सन्मानाचे मानकरी ठर

सुमारे १८ वर्षांपूर्वीची गोष्ट. मी पुण्यात कमला नेहरू पार्कजवळ रिक्षाच्या शोधात होतो. अजून संध्याकाळच्या भर रहदारीच्या वेळेला अवकाश होता. अशा वेळी...

''कोण, डॉ. नारळीकर का?''

मी वळून पाहिले. एक उंच, बारीक अंगयष्टीचा हसऱ्या चेहऱ्याचा तरुण बोलत होता. ''माझं नाव माशेलकर, रमेश माशेलकर. मी एन.सी.एल.मध्ये असतो.''

रमेश... तथा रघुनाथ माशेलकर हे नाव मी पूर्वी ऐकलं होतं. ते मुंबई विद्यापीठातून विशेष गुणवत्ता मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या संदर्भात. प्रत्यक्ष भेटीचा मौका असा अचानकपणे मिळाला. रमेश त्यावेळी कमला नेहरू पार्कजवळच एका फ्लॅटमध्ये राहात होता. त्याने घरी यायचे आग्रहाचे आमंत्रण दिले; पण त्यावेळी मी गडबडीत असल्याने शक्य झाले नाही. मी रिक्षात बसून निघालो, तेव्हा माझ्या डोळ्यापुढे होता रमेशचा उत्साही चेहरा.

* * *

१९८६ मध्ये पंतप्रधान राजीव गांधींनी एक वैज्ञानिक सल्लागार समिती नेमली. मी त्या समितीचा एक सभासद होतो. शासकीय निर्बंधातून मुक्त अशा वातावरणात त्या समितीने काम करावे, अशी पंतप्रधानांची अपेक्षा होती आणि म्हणून त्यांनी या समितीवर नोकरशहांना नेमण्याचे कटाक्षाने टाळले. पुढे एक-दोन वर्षांत रमेश पण या समितीचा सभासद झाला. मला वाटते तो सर्व सभासदांत वयाने लहान होता.

पण त्याच्याबरोबर समितीवर काम करताना त्याचा एक महत्त्वाचा गुण माझ्या नजरेस आला... तो म्हणजे आशावाद. एखाद्या अवघड परिस्थितीला तोंड देताना वेगवेगळ्या प्रतिक्रिया असू शकतात. उदाहरणार्थ... ही परिस्थिती का निर्माण झाली अशी तक्रार करत जबाबदार लोकांना दोष देणे... परिस्थिती इतकी वाईट आहे की, यातून मार्ग निघणार नाही म्हणून हातपाय गाळणे... किंवा अमुक तमुक केले असते तर अशी परिस्थिती उद्‌भवलीच नसती, अशी मल्लिनाथी करणे... अथवा दुसऱ्या कोणी परिस्थितीवर उपाय सुचवलाच तर तो शासकीय किंवा तत्सम नियमात बसत नाही, असे ठामपणे सांगणे...

ऋणात्मक प्रतिक्रिया पुष्कळ असू शकतात. फक्त त्यांचा उद्‌भवलेल्या प्रश्नावर तोडगा काढायला काहीही उपयोग होत नाही. अशा वेळी हवी असते धनात्मक प्रतिक्रिया आणि ती सुचायला आणि इतरांना सुचवायला हवा असतो दुर्दम्य आशावाद. असा आशावाद फार कमी लोकांत आढळतो. रमेशला अशा आशावादाची देणगी मिळाली आहे हे मला त्याच्या समितीतील सहभागातून जाणवले.

* * *

ही आशावादाची देणगी जन्मजात असावी. कारण अतिशय गरिबीतून मार्ग काढत रमेशने यशाचा कलश संपादन केला आहे. 'अजून पुढे जा' असे त्याच्या मातुश्रींनी प्रत्येक यशाप्रसंगी आवाहन केल्यामुळे रमेश पुढे जात राहिला. त्यामागे मातापुत्रांचा आशावाद असल्याशिवाय हे सर्व साध्य झाले नसते.

नॅशनल केमिकल लॅबोरेटरीसारख्या प्रख्यात आणि प्रथितयश संस्थेचे संचालकपद स्वीकारल्यावर रमेशने त्या संस्थेच्या कार्यप्रणालीत महत्त्वाचे बदल केले. स्वतंत्र विचार करण्यावर भर दिला. सरकारी अनुदानावर सर्वस्वी अवलंबून न राहता स्वत: लावलेल्या शोधांना बाजारात आणून त्यांच्या आधारे पुढे जाण्यास प्रोत्साहन दिले. शोधांचा विविध देशात वापर व्हावा, यासाठी करार केले आणि शोधांच्या अज्ञात दुनियेत साहसाने पाऊल टाकण्यासाठी 'व्हेंचर' या नावाखाली खास आर्थिक सहाय्य जाहीर केले.

या सगळ्या कर्तृत्वामागूनही डोकावतो रमेशचा आशावादच. विशेष करून व्हेंचरला उत्तेजन देण्यात त्याने तरुण वैज्ञानिकांपुढे जणू एक आव्हानच ठेवले आहे. 'ऐपत असली तर परंपरेपासून दूर जाऊन नवे काही तरी करून दाखवा... मी पाठीशी उभा आहे.' चालले हे उत्तम आहे, उगाच भलतीकडे जाण्याचे साहस करू नका, असे सांगणारे संचालक पुष्कळ भेटतील; पण साहसी प्रवृत्तीला उत्तेजन देणारा हा संचालक आगळावेगळाच म्हटले पाहिजे.

***

काही वर्षांपूर्वी 'डायरेक्टर'पासून 'डायरेक्टर जनरल'च्या पदावर चढून रमेश दिल्लीला गेला, तेव्हा अनेक हितचिंतकांना असे वाटले असणार की, या हाडाच्या शास्त्रज्ञाला दिल्लीची नोकरशाही आपले भक्ष्य करणार; परंतु आपले संशोधन चालू ठेवून (त्यासाठी वीकएंडला पुण्यात येत राहून) त्याने आपली वैज्ञानिक प्रतिमा पूर्ववत ठेवली आहे आणि 'डी.जी.'च्या अधिकारांचा सुयोग्य वापर करून त्याने अख्ख्या सी. एस. आय. आर.ला नवे रूप द्यायला सुरुवात केली आहे. जे एन.सी.एल.च्या बाबतीत यशस्वी ठरले ते तशा संस्थांच्या जाळ्याला का पडू नये? पेटंट, आय.पी.आर. इत्यादी केवळ कागदावरचे शब्द नसून, आजच्या चढाओढीच्या विज्ञान तंत्रज्ञानानुसार यशस्वीपणे वावरण्याचे मंत्र आहेत हे तो मौका मिळेल तिथे आवर्जून सांगतो आणि प्रत्यक्ष कृतीने दाखवून देतो.

हे सर्व कसे शक्य झाले? कारण त्यामागे आहे रमेशची आशावादी मनोवृत्ती. निराशावादी माणूस पहिले पाऊल टाकायला कचरतो. तोपर्यंत आशावादी माणूस अनेक योजनेपुढे गेलेला असतो.

व्यक्तिम

रमेशच्या पुढील वाटचालीला माझ्या शुभकामना!

**– जयंत नारळीकर**



**चालले हे उत्तम आहे, उगाच भलतीकडे जाण्याचे साहस करू नका, असे सांगणारे संचालक पुष्कळ भेटतील; पण साहसी प्रवृत्तीला उत्तेजन देणारा हा संचालक आगळावेगळाच म्हटले पाहिजे.**